नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 10/02/2021 (बुधवार)
(सकाळ)

---

## दुखापत

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 15 कि. मी अंतरावर धानला येथे दरम्यान दि. 09/02/2021 चे 18.00 वा. फिर्यादी नामे– शंकर फत्तु उके, वय 65 वर्ष, रा. धानला, ता मौदा हा आपल्या बक–या बांधण्याची जागा झाडत असता जमीनीवरील कचरा फिर्यादीचे तोंडात गेल्याने फिर्यादीने बाजुला थुंकले असता आरोपी क्र. 1) हरीचंद्र चनोडे हा तीथे उभा होता व फिर्यादीला म्हणाला की, ''तु मला पाहुन कश्याला थुंकला व मला कश्याला शिव्या दिल्या'' असे म्हणुन फिर्यादीचे अंगणात ठेवलेली खुर्ची फिर्यादीला फेकुन मारली. तसेच आरोपी क्र 2) विनोद चनोडे हा तीथे आला व फिर्यादीला मारत असता त्याचा हातातील लोखंडी कडा फिर्यादीचे डोक्याला लागले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीतांविरुध्द कलम 324, 504, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ ठाकुर 7083151993 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 12 कि.मी. अंतरावर चारगाव ते सिल्लपार रोडवर येथे दिनांक 23/01/2021 चे 18:30 वा. दरम्यान एमएच– 40/एव्ही– 8479 क्रमांकाच्या मोटरसायकलचा चालक आरोपी नामे– संतोष हरि डावे, वय 30 वर्ष, रा. नांद त. भिवापुर जि. नागपूर हा मृतक नामे– बाळकृष्ण झिंगरू शेरकी यास त्याच्या मोटरसायकलवर मागे बसवुन उमरेड वरून त्याचे गावी नांद येथे जात होता. त्यादरम्यान सिल्लेपार शिवारात अचानक जंगली डुकरांचे कडप समोर आल्याने आरोपीचे मोटरसायकल नियंत्रण सुटल्याने त्याची मोटरसायकल स्लिप होवुन दोघेही खाली पडले. आरोपी याने त्याचे ताब्यातील मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन बाळकृष्ण शेरकी याचे मरण्यास कारणीभुत ठरला. मर्ग क्र. 08/21 कलम 174 जाफौ च्या चौकशी अहवालावरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा अजितसिंग ठाकुर, पो. स्टे. उमरेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ)भादंवी. सहकलम 184, 3(1)/181 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री राजीव लोले 8080290801 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर